# केळी

**पिकाचे नाव:** केळी
**वैज्ञानिक नाव:** मुसा पॅराडेसिका
**कुळ:** मुसासी
**लागवड अंतर:** 5x5, 5x6, 5x7, 6x5, 6x6, 6x7 फूट
**वाण:** ग्रॅंड नैन टिश्यू कल्चर, ब्लू जावा टिश्यू कल्चर

**वाण:** ग्रॅंड नैन टिश्यू कल्चर, ब्लू जावा टिश्यू कल्चर

**केळीचे गुणधर्म:** भारत देश हा जगातिल सर्वातम मोठा केळी उत्पादन करणारा देश आहे तसेच आंध्र प्रदेश राज्य उत्पादनात आघाडीचे राज्य असून त्यानंतर महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यांचा क्रमांक लागतो. केळी फायबर, पोटॅशियम आणि जीवनसत्त्वे यांचा समृद्ध स्रोत आहे.

**माती:** चांगला निचरा होणारी, मध्यम ते काळ्या स्वरूपाची सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध माती, जिचा सामू 6.5-7.5 असलेली जमीन लागवडी साठी निवडावी.

**हवामान:** केळी ही उष्ण व दमट हवामान घेतली जाणारी उष्णकटिबंधीय वनस्पती आहे, वाढीसाठी योग्य तापमान 20-30° सेल्सिअस आवश्यक, कमी आणि जास्त तापमान लागवडीसाठी हानिकारक आहे. तपमान 10° सेल्सिअस पेक्षा कमी झाल्यास पिकाची वाढ थांबल्या जाते. वार्षिक पाऊस 100-320 सेंमी पर्यंत योग्य.

**उत्पादन:** लागवडी पासून 10-12 महिन्यात उत्पादन मिळते, साधारण 25-30 किलो प्रति झाड (35-40टन/एकरी).



# केळी
## ग्रँड नैन टिश्यू कल्चर

**वाण:** ग्रँड नैन टिश्यू कल्चर
**लागवड दिनांक:** 06/07/2023
**लागवड अंतर:** 5 x 6 फूट
**लागवड क्षेत्र:** 15 R
**एकूण रोप संख्या:** 580

**ग्रँड नैन जातीची वैशिष्टे:** G 9 ही सर्वाधिक उत्पन्न देणारी जात आहे (३० किलो/रोप), लांब, दंडगोलाकार, आकर्षक, दर्जेदार टिकवण क्षमता असलेली ही फळे लांब वाहतुकीसाठी चांगली आहे. टिश्यू कल्चर पासून रोपे बनवण्यासाठी योग्य जात. रोग आणि कीटक प्रतिकारक्षम.

**उत्पादन:** सरासरी 25-30 किलो/झाड, तसेच हे उत्पादन 35-40किलो/झाड एवढे जाते.



# केळी

## ब्लू जावा टिश्यू कल्चर

**वाण:** ब्लू जावा टिश्यू कल्चर
**लागवड दिनांक:** 06/07/2023
**लागवड अंतर:** 5 x 6 फूट
**लागवड क्षेत्र:** 1.6 R
**रोप संख्या:** 60

**ब्लू जावा जातीची वैशिष्टे:** ब्लु जावा ही कडक थंडी सहन करणारी केळीची जात आहे, जी आइस्क्रीम सारखी व्हानेला चव आणि निळसर रंगाच्या सुगंधी फळासाठी ओळखली जाते. उंचीला जास्त असणाऱ्या या केळीला आइस्क्रीम केळी सुद्धा म्हंटले जाते. फळांचा आकार मध्यम स्वरुपाचा.

**उत्पादन:** 12-15 किलो प्रति झाड (15-17 टन/एकर).

